महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ ०१ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०१० ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# वाडा - भिवंडी महामार्गाचे निकृष्ट दर्जाचे काँक्रीटीकरण

## नव्याने तयार होत असलेल्या काँक्रिट रस्त्याला भगदाड




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : वाडा ते भिवंडी या महामार्गाच्या काँक्रीटीकरणाला सुरुवात झाली असून अनेक टप्प्यात एकेरी रस्त्याचे काम देखील पूर्ण झाले आहे. वाडा तालुक्यातील वैतरणा नदीच्या पुलाजवळ नव्याने तयार होत असलेल्या काँक्रिट रस्त्याला भगदाड पडले असून हा निकृष्ट कामाचा नमुना असल्याचा अनेकांनी आरोप केला आहे. कंत्राटदार कंपनीच्या एका अधिकाऱ्याला विचारणा केली असता रस्त्याच्या जॉइंटवर थोडा भाग खचला असून अवजड वाहतूक रोखणे अशक्य होत असल्याने हा प्रकार झाला आहे, दुरुस्ती केली आहे मात्र वाहतूक सुरूच राहिली तर पुन्हा तिथे रस्ता खराब होण्याची शक्यता आहे असेही त्यांनी सांगितले. वाडा ते भिवंडी या महामार्गाच्या दुर्दशेविषयी नुकताच तब्बल 12 तास रास्तारोको आंदोलन करण्यात आले असून यावेळी कासवगतीने व निकृष्ट दर्जाचे काम होत असल्याचा आंदोलनांनी आरोप केला होता. आंदोलनाला काही तास उलटले नाहीत तोच वैतरणा पुलाजवळ काँक्रिटचा काही भाग उखडल्याचे पहायला मिळाले. खरेतर या महामार्गाच्या काँक्रीटीकरणाचे काम उत्तम दर्जाचे सुरू असताना उखडलेला भाग नक्कीच चिंताजनक असून कंत्राटदाराने या भागाची दुरुस्ती देखील केली आहे.

महामार्गावर काँक्रीटीकरण सुरू असताना एकेरी वाहतूक मात्र खड्डयांमुळे जीवघेणी बनत होती. काँक्रीटीकरण झाल्यावर 28 दिवसांत त्यावरून वाहतूक खुली करता येते मात्र एकेरी मार्गाची दुर्दशा झाल्याने अनेक ठिकाणी वेळेची मर्यादा पाळली जात नाही. यातूनच हा मार्ग उखडल्याचे बोलले जात आहे. 12 तासांच्या आंदोलनाने तातडीने काँक्रिट मार्ग खुले करण्यात आले असून काँक्रिट मार्गावरून अवजड वाहनांना बंदी असतानाही बंदी केवळ फलकांवर असून प्रत्यक्षात वाहनचालकांची मनमानी येथे पहायला मिळत आहे. काँक्रीटीकरणाच्या बाजूचा एकेरी मार्ग तातडीने दुरुस्त करून अवजड वाहनांची रवानगी त्यादिशेने करावी अशी मागणी केली जात आहे.

# कल्याण बाजार समिती विजयी उमेदवारांनी घेतली आमदार रवींद्र चव्हाण, किसन कथोरे यांची भेट





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत भाजप प्रणित महायुतीच्या सर्व विजयी उमेदवारांनी आमदार किसन कथोरे आणि रवींद्र चव्हाण यांची भेट घेत आनंद व्यक्त केला. यावेळी कथोरे यांनी चव्हाण सर्व उमेदवारांचे अभिनंदन करून पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. शेतकरी बांधव आणि व्यापाऱ्यांच्या समस्यांना योग्य न्याय द्या आणि बाजार समितीच्या सुयोग्य विकासासाठी कटिबद्ध व्हा, असा सूचना आमदार किसन कथोरे यांनी यावेळी विजयी उमेदवारांना दिल्या

## थोडक्यात महत्वाचे

# अंबरनाथ , बदलापूर शहरांना नगररचनाकार नाही ?

## प्रभारी अधिकाऱ्यांवर शहर व्यवस्थापनाची भिस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** अंबरनाथ आणि कुळगाव बदलापूर नगरपालिकेच्या नगररचना पदावर अधिकारी मिळत नसल्याने या विभागाचा कारभार प्रभारी अधिकाऱ्यांवर सोपवण्यात आला आहे. त्यामुळे शहर नियोजनाचा खेळखंडोबा झाला असून विविध बांधकाम परवानग्यांची कामे रखडल्याने व्यावसायिक हतबल झाले आहेत. शेजारच्या उल्हासनगर शहरातही नगररचना सहायक संचालक अवघ्या ६ दिवसांसाठी मिळाले. त्यापूर्वी इथेही प्रभारी अधिकाऱ्यांवर कारभाराची भिस्त होती.

अंबरनाथ आणि बदलापूर ही दोन शहरे झपाट्याने विकसीत होत आहेत. परवडणारी घरे, निसर्गरम्य वातावरण आणि नोकरदार वर्गाची मोठी संख्या या मुळे या दोन शहरात राहण्याला पसंती दिली जाते. गेल्या काही वर्षात नोकरदार वर्गासह मुंबईच्या गर्दीतून शांततेत जीवन व्यतीत करण्यासाठी या दोन शहरांमध्ये घरे घेतली जातात. त्यामुळे परवडणाऱ्या घरांसोबतच या दोन्ही शहरात सुसज्ज सुविधांसह लाखो रूपयांची घरेही उपलब्ध झालेली आहेत. अंबरनाथसारख्या शहरात तर पुनर्विकासाला वेग मिळाला आहे. सुर्योदय सोसायटीसह विविध भागात अनेक पुनर्विकासाचे प्रकल्प सुरू आहेत. काही प्रकल्प सुरू होण्याच्या मार्गावर आहेत. अनेक नव्या घरांचे काम पूर्ण झाले असून त्यांना पुर्णत्वाचा दाखला आवश्यक आहे. अशा अनेक कामांसाठी पालिकांच्या नगररचना विभागावर अवलंबून राहावे लागले.

# आरोग्य अभियानातील हजारो कंत्राटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** गेली १५ ते २० वर्षांपासून आरोग्य व्यवस्थेचा कणा बनून राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम करणाऱ्या हजारो कंत्राटी कर्मचाऱ्यांनी शासनाच्या उदासीनतेविरोधात सोमवारी ठाण्यातील शासकीय विश्रामगृहा बाहेर आंदोलन केले.

राष्ट्रीय आरोग्य अभियान एकीकरण समितीच्या वतीने हे आंदोलन छेडण्यात आले होते. यात, कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांचे फलक हातात घेऊन घोषणाबाजी केली.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत हजारोच्या संख्येने कर्मचारी कंत्राची पद्धतीने आरोग्य व्यवस्थेत गेले १५ ते २० वर्षांपासून काम करत आहेत. या कर्मचाऱ्यांना हक्काचे स्थान आणि सन्मान द्यावा अशी मागणी राष्ट्रीय आरोग्य अभियान एकीकरण समितीने केली आहे. तसेच उच्च न्यायालय औरंगाबाद यांच्या निकालाची अंमलबजावणी करावी, १४ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार कर्मचाऱ्यांचे समायोजन तत्काळ करण्यात यावे, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात १०% वाढ करावी, नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे ५% वार्षिक वाढ लागू करावी, समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांसाठी एकवेळ बदली धोरण लागू करावे, सर्व कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण आणि भविष्य निर्वाह निधी योजना लागू कराव्यात अशा विविध मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले असल्याची माहिती समितीचे राज्य समन्वयक मनीष खैरनार यांनी दिली.

# भाजपा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदासाठी आमदार रवींद्र चव्हाण यांचा नामांकन अर्ज दाखल




> भाजपा हीच माझी ओळख आहे, याचा सार्थ अभिमान आहे ! - आमदार रवींद्र चव्हाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

आज भाजपा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदासाठी नामांकन अर्ज केंद्रीय मंत्री आदरणीय किरेनजी रिजिजू यांच्याकडे सुपूर्द केला. "राष्ट्र प्रथम्, त्यानंतर पक्ष आणि शेवटी स्वतः" हा भाजपा परिवाराचा मूलमंत्र अनुसरून, अंत्योदयाच्या मार्गावर आजवर वाटचाल करत पक्षश्रेष्ठींचे मार्गदर्शन, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोलाची साथ आणि जनतेचे आशीर्वाद लाभले या शुभेच्छा आणि आशीर्वादाच्या पाठबळावर आज भाजपा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदासाठी नामांकन अर्ज दाखल करत आहे' 'अशा भावना आमदार चव्हाण यांनी व्यक्त केल्या.

यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह महाराष्ट्रातील भाजपाचे अनेक मंत्री, खासदार, आमदार, जिल्हाध्यक्ष व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# पर्यावरणपूरक-ट्रॅक्टर शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडवून आणेल

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** पर्यावरण पूरक व पैशाची बचत करणारा इ-ट्रॅक्टर कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणेल, असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. ते ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात देशातील पहिल्या इ-ट्रॅक्टरची नोंदणी करताना बोलत होते. यावेळी ठाणे प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिणी पाटील, इ-ट्रॅक्टर निर्मिती करणाऱ्या अॅटोनेक्स कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ धोंडे व सेल्स मॅनेजर अभिषेक शिंदे हे उपस्थित होते.

मंत्री सरनाईक म्हणाले की, सन २०३० पर्यंत रस्त्यावरील एकूण वाहनांच्या संख्येमध्ये २० ते ३० टक्के वाहने ही विजेवर चालणारी असावीत, असे शासनाचे धोरण आहे. त्या अनुषंगाने इ-वाहनांना टोल माफी व खरेदीवर थेट अनुदान देण्याची योजना शासनाने आखली आहे. याचा फायदा इ-ट्रॅक्टर खरेदी करणाऱ्या शेतकऱ्यांना होणार आहे.

तसेच इतर डिझेल ट्रॅक्टरच्या तुलनेमध्ये इ-ट्रॅक्टरचा देखभाल आणि दुरुस्तीचा खर्च जवळ जवळ शून्य आहे. तसेच वापर करताना लागणाऱ्या वीजेचा खर्च डिझेल इंधनाच्या तुलनेत ६० ते ७० टक्के ने कमी होणार आहे. त्यामुळे भविष्यात इ-ट्रॅक्टर शेतकऱ्यांचा 'किमयागार' ठरणार आहे. ऑटोनेक्स्ट या कंपनीने भारतातील पहिला स्वदेशी निर्मित इ-ट्रॅक्टर यशस्वीपणे बाजारात आणला आहे.









# गीतासार



## अध्याय १५
## पुरुषोत्तमयोगः

श्रीभगवानुवाच
ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् । छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥ १५-१ ॥

भगवान श्रीकृष्ण म्हणाले, आदिपुरुष परमेश्वररूपी मूळ असलेल्या, ब्रह्मदेवरूप मुख्य फांदी असलेल्या, ज्या संसाररूप अश्वत्थवृक्षाला अविनाशी म्हणतात, तसेच वेद ही ज्याची पाने म्हटली आहेत, त्या संसाररूप वृक्षाला जो पुरुष मुळासहित तत्त्वतः जाणतो, तो वेदांचे तात्पर्य जाणणारा आहे. ॥ १५-१ ॥

अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः । अधश्च मूलान्यनुसन्ततानि कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके ॥ १५-२ ॥

त्या संसारवृक्षाच्या तिन्ही गुणरूपी पाण्याने वाढलेल्या, तसेच विषयभोगरूप अंकुरांच्या, देव, मनुष्य आणि पशुपक्ष्यादी योनिरूप फांद्या खाली व वर सर्वत्र पसरल्या आहेत. तसेच मनुष्ययोनीत कर्मांनुसार बांधणारी अहंता, ममता आणि वासना रूपी मुळेही खाली व वर सर्व लोकांत व्यापून राहिली आहेत. ॥ १५-२ ॥

न रूपमस्येह तथोपलभ्यते नान्तो न चादिर्न च सम्प्रतिष्ठा । अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा ॥ १५-३ ॥

या संसारवृक्षाचे स्वरूप जसे सांगितले आहे, तसे येथे विचारकाळी आढळत नाही. कारण याचा आदी नाही, अंत नाही. तसेच त्याची उत्तम प्रकारे स्थिरताही नाही. म्हणून या अहंता, ममता आणि वासना रूपी अतिशय घट्ट मुळे असलेल्या संसाररूपी अश्वत्थवृक्षाला बळकट वैराग्यरूप शस्त्राने कापून ॥ १५-३ ॥

# पाच वर्षानंतर कैलास मानसरोवर यात्रेला सुरुवात



चीनच्या हद्दीत पोहचला ठाणे जिल्ह्यातील डी वाय फाउंडेशनच्या महिलांचा पहिला गट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : पाच वर्षांपासून बंद असलेल्या पवित्र कैलास मानसरोवर यात्रेला पाच वर्षानंतर १५ जुलै २०२५ पासून पुन्हा एकदा सुरुवात झाली आहे. या यात्रेसाठी निघालेल्या ठाणे जिल्ह्यातील भिवंडीचा महिलांचा पहिला गट चीनच्या हद्दीत दाखल झाला आहे.या गटात भिवंडीतील डी.वाय.फाउंडेशनच्या महिला अध्यक्षा प्रियांकाताई दयानंद चोरघे यांच्यासह भिवंडीतील महिलांचा समावेश आहे. महिलांच्या या धार्मिक यात्रेला जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दयानंद चोरघे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

कैलास मानसरोवर यात्रा ही अध्यात्माची उच्च अनुभूती देणारे स्थान आहे. कोरोना महामारीमुळे २०२० पासून कैलास मानसरोवर यात्रेवर लागलेली बंदी आता उठवण्यात आली आहे. त्यामुळे भाविकांना कैलास मानसरोवर यात्रा करण्याचे भाग्य लाभले आहे. या यात्रेसाठी ठाण्यातील महिलांचा पहिला गट चीनच्या हद्दीत दाखल झाला असून या गटात भिवंडीतील डी.वाय.फाउंडेशनच्या महिला अध्यक्षा प्रियांकाताई दयानंद चोरघे यांच्यासह भिवंडीतील महिलांचा समावेश आहे. अध्यात्मिक वारसा लाभलेल्या चोरघे कुटुंबातील धार्मिक वृत्तीच्या प्रियांकाताई या नियमित विविध तीर्थस्थळांना भेटी देत असून अशा ठिकाणी भगवान शिवाच्या कृपेने प्रथम यात्रेकरू होण्याचे भाग्य लाभल्याने भगवान शिवाने आपला कृपेचा हात आपल्यावर ठेवल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे या मानसरोवर यात्रेचे आयोजन भिवंडी तालुक्यातील कोनगांवच्या विद्यमान सरपंच रेखा सदाशिव पाटील यांनी केले आहे.

कैलास मानसरोवर पहिल्या तुकडीमध्ये डी.वाय.फाउंडेशनच्या महिला अध्यक्ष प्रियांकाताई दयानंद चोरघे यांच्यासह कोनगांव सरपंद रेखा सदाशिव पाटील, बेबी बाळाराम चौधरी,वर्षा चौधरी, मोना म्हात्रे, हर्षला चौधरी, भानुमती पाटील, आरती भोईर, रचना पाटील, मोनिका भोईर, मनीषा कीणे, करुणा पाटील, गिरीजा पाटील, प्रीतीशा पाटील, चम्पा भोईर, भारती म्हात्रे, तनिष्का चौधरी, ओम चौधारी, जोत्स्ना पाटील, उज्वला विनोद ठाकरे, आर्या चौधरी, मीनाक्षी पाटील, यांचा समावेश आहे. या सर्वांनी आज रोजी ३० जुन रोजी यमद्वार पासुन कैलास मानसरोवर यात्रा संपुर्ण परिक्रमा करण्यास सुरुवात केली आहे.


# आत्महत्या केलेल्या रिक्षाचालकाच्या कुटुंबियांची मंत्री आठवले यांनी घेतली भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**डोंबिवली** : पश्चिमेकडील महात्मा फुले नगर येथील रहिवासी मुंजाजी शेळके यांनी गळफास लावून आत्महत्या केली होती. काही अज्ञात इसमांनी शेळके यांना मारहाण केल्याचा आरोप कुटुंब्रियांनी करत विष्णूनगर पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन केले होते. सोमवारी 30 तारखेला शेळके परिवाराचे सांत्वन करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपाइं आठवले पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले हे डोंबिवलीत आले होते. त्यांनी शेळके कुटुंबियांची सांत्वन भेट घेतली यावेळी आठवले म्हणाले, मुख्यमंत्र्यांना सांगून शेळके कुटुंबियांना आर्थिक मदत कशी मिळेल याकरिता प्रयत्न करेन.

# हरित क्रांतीचे जनक
# वसंतराव नाईक



अन्नदाता शेतकरी जर समृद्ध झाला,तर राज्यासह देशाही सुजलाम सुफलाम होईल,हा संदेश देणारे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी यवतमाळ जिल्हयाच्या पुसद तालुक्यातील गहुली येथे फुलसिंग नाईक यांच्या बंजारा समाजाच्या शेतकरी कुटुंबात झाला.अन् जणू भटक्या अन् विमुक्त जातींचा कैवारी उदयास आला.

महत्वाचे म्हणजे १ मे १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यावर राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात वसंतरावांनी महसूल मंत्र्याची धुरा सांभाळली. इतकेच नव्हे तर,नाईकसाहेबांनी पुढे सलग १२ वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून उल्लेखनीय कार्य करून राज्याच्या राजकारणात त्यांची अजातशत्रू व वादातीत राज्यकर्ते म्हणून ओळख झाली. नाईकसाहेबांना आपल्या कार्यकाळात सर्वसामान्य लोकांचे प्रश्न सोडविताना अग्नीदिव्यातून जावे लागले होते.कारण त्यांच्या कार्यकाळात दोन युद्धे आणि तीन दुष्काळांना सामोरे जावे लागले. तरीही अशा प्रतिकूल परिस्थितीत शिवरायांचा महाराष्ट्र हा ताट मानेने उभा राहिला अन् कोणापुढे झुकला नाही.

दर्जेदार कृषी उत्पादनाच्या वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा,असा शेतकऱ्यांना संदेश देऊन नाईकसाहेबांनी हरित क्रांतीच्या दिशेने वाटचाल केली.१९७२ च्या भीषण दुष्काळाने साऱ्या राज्यात कहर केल्याने शेतकरी,शेतमजूर,कामगार व हाता-पोटावर जीवन जगणाऱ्या कष्टकरी लोकांसमोर उदरनिर्वाह करण्याचा जटिल प्रश्न उभा राहिला होता.या बिकट परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी वसंतराव नाईक यांनी रोजगार हमी योजने ची संकल्पना मांडली. या योजनेअंतर्गत शेती व शेतीपूरक कामे मिळत गेल्याने सामान्य लोकांना मोठा दिलासा मिळाला. ही अभिनव योजना राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य गणले गेले.

भारताच्या तत्कालिन पंतप्रधान दिवंगत इंदिराजी गांधी यांनी रोजगार हमी योजनेची मुक्तकंठाने प्रशंसा करून तत्कालिन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचं अभिनंदन केलं होतं. राज्यातील लोकांना अवर्षण काळात धीर देताना नाईकसाहेब म्हणाले की,"दुष्काळाच्या परिस्थितीतही महाराष्ट्रातील माणसं कुणाच्या दयेवर जगणार नाहीत,तर काबाडकष्ट करून,मानाची चटणी-भाकर मिळवतील,पण कोणापुढे हात पसरणार नाहीत.विशेष म्हणजे महाराष्ट्राचा स्वाभिमानी इतिहास कोणाला बदलता येणार नाही". वास्तविक पहाता,वसंतरावांनी राज्यातील शेतकरी,कष्टकरी कामगार,शेतमजूर यांना संकटकाळातही ताट मानेनं जगण्याची शिकवण दिली.राजकारणातून समाजकारण कसं करावं,हा बाळकडू नाईकसाहेबांनी राज्यकर्त्यांना दिला. वसंतराव नाईक यांनी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली,याबद्दल तत्कालिन राज्य सरकारने त्यांचा १ जुलै हा जन्म दिवस राज्यात कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. नाईकसाहेबांच्या नावाने राबविलेले वसंत बंधारे ही योजना राज्यात सर्वदूर राबविण्यात आली.पाणी अडवा,पाणी जिरवा हे ब्रीद सर्वच शेतकऱ्यांनी आत्मसात करून आपल्या कृषीक्षेत्रात कार्यान्वित केलं.

**पत्रकार :रणवीर राजपूत**
**गवर्नमेंट मीडिया,महाराष्ट्र शासन**

नाईकसाहेबांच्या मते आजचा शेतकरी हा उद्याचा कारखानदार व्हावयास पाहिजे. या पार्श्वभूमीवर त्यांनी राज्यात साखर कारखाने,सुत गिरण्या,कुक्कुटपालन पशुपालन,दुग्धव्यवसाय सुरू करण्यास चालना दिली.वास्तवात त्यांनी शेतकऱ्यांना उद्यमशील होण्याचा महामार्ग दाखविला.वास्तवात नाईकसाहेब हे शेतकऱ्यांचे कैवारी होते.कृतज्ञतेच्या भावनेतून तत्कालिन राज्य सरकारने १९८४ मध्ये भटक्या व विमुक्त जातींच्या लोकांना स्वयंरोजगार उभारण्यासाठी अल्पदरात कर्ज मिळावे,या उद्देशाने वसंतराव नाईक वित्त व विकास महामंडळ स्थापन केले.

मराठी ही राज्यातील लोकांची बोली भाषा असल्याने, नाईकसाहेबांनी आपल्या कार्यकाळात प्राधान्याने तिला राजभाषेचा दर्जा देण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्यामुळे राज्यातील सर्वसामान्य लोकांना शासकीय कामकाजातील नियम,कायदे समजणे आणि सरकारी कर्मचाऱ्यांशी समन्वय अन् संवाद साधणे सुकर झाले.सरकारी कामकाजात मराठी भाषेचा वापर अनिवार्य झाल्याने शासनस्तरावर जनतेचे जिव्हाळयाचे प्रश्न तथा कामे यांचा निपटारा जलदगतीने होऊ लागला.मराठी राजभाषेला लोकाभिमुख करण्याचे सर्वस्वी श्रेय नाईकसाहेबांना जाते.याबद्दल राज्यातील मराठी माणूस हा नाईकसाहेबांचा सदैव ऋणी राहील.हाच धागा धरून राज्यातील महायुती सरकार हे केंद्रातील मोदी सरकारकडून मराठीला अभिजात भाषे चा दर्जा मिळविण्यात यशस्वी झाले आहे.याबद्दल राज्यातील जनतेने केंद्रातील मोदी सरकार अन् राज्यातील महायुती सरकारचे शतशः आभार मानले आहेत.

स्व.वसंतराव नाईक यांचा आदर्श घेऊन राज्यातील अल्पभूधारक शेतकरी, शेतमजूर, कामगार यांच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्यातील महायुती सरकार हे यशस्वी वाटचाल करत आहे.शेतकऱ्यांसाठी विविध लाभदायक योजना राबविल्या. त्यात एक रुपयाची कृषी विमा योजना व अन्य योजनांचा समावेश आहे.अतिवृष्टी झालेल्या जिल्ह्यामधील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येत असून, अल्पभूधारक शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जात आहे. त्यामुळे बळीराजाला मोठा दिलासा मिळाला आहे.परिणामी महायुती सरकार हे आपले सरकार आहे,ही जाणीव शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाल्याचे प्रतिबिंबित होते.

चला तर,आपण सर्वजण लोकसहभागातून राज्यात पुनश्च हरित क्रांती निर्माण करण्यास सरकारला हातभार लावूया अन् लोकनेते वसंतराव नाईक यांचे स्वप्न साकार करूया!

## मुरबाड महसूल विभागातील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी
# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या वतीने तहसिलदारांना लेखी निवेदन !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड(दिलीप पवार)** : गेली अनेक वर्ष मुरबाड महसूल विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळलेला दिसून येत आहे. सामान्य शेतकऱ्यांना आपल्या वडिलोपार्जित जमिनी विषयी कामासंबंधी तहसिल कार्यालय, तलाठी कार्यालय , मंडळ अधिकारी यांच्या कडे चपला झिजवाव्या लागतात.महसूल विभागातील अनेक अधिकारी ,कर्मचारी सामान्य शेतकऱ्यांकडून जमीनीचे काम करून देण्यासाठी सर्रास पैशाची मागणी करतात किंवा पैसे घेतल्या शिवाय काम करत नाही. यामुळे तालुक्यातील शेतकरी वर्ग मेटाकुटीला आल्याचे दिसत आहे. मुरबाड महसूल विभागातील अनेक तलाठी ,मंडळ अधिकारी यांना यापुर्वी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडून कारवाईचा बडगा उगारला असतानाही हे कर्मचारी, अधिकारी ऐकत नाहीत. दोनच दिवसापुर्वी म्हाडस सजा मधील तलाठी वैशाली गडदे व तिचा खाजगी मदतनीस याला दोन



हजाराची लाच घेताना अटक झाली आहे.

हा बोकाळलेला भ्रष्टाचार थांबला पाहिजे तसेच प्रशासनात शिस्त आली पाहिजे त्यासाठी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुरबाड तालुका अध्यक्ष दिलीप पवार यांच्या नेतृत्वाखाली आज तहसिलदार अभिजित देशमुख यांना लेखी निवेदन दिले आहे. यामध्ये अधिकारी कर्मचारी यांना कार्यालयात शासकीय ओळखपत्र घालणे बंधनकारक करणे, मुख्यालयी वास्तव्यास राहणे व कार्यालयीन वेळेत उपस्थित राहणे अशा विविध मागण्या यावेळी महासंघाच्या वतिने करण्यात आल्या असून यावर तुमच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून आपण निश्चित अमंलबजावणी करू असे आश्वासन तहसिलदार अभिजित देशमुख यांनी दिले.

यावेळी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष शंकर वडवले,जिल्हा कार्याध्यक्ष संतोष घुडे, प्रकाश विशे, निलेश बांगर, एकनाथ भोईर, सुरेश पष्टे, कल्पना पवार उपस्थित होते.

## रेसिपी
# बटाटा चिवडा



साहित्य-आठ - बटाटे ,दोन - लिंबू ,एक टीस्पून- काळी मिरी पावडर ,दोन टीस्पून- जिरे पूड ,शेंगदाणा तेल ,आमसूल पूड ,सेंधव मीठ

कृती- सर्वात आधी बटाटे सोलून घ्या, आता पाण्याने चांगले धुवा आणि स्वच्छ करा. तसेच लांब पट्ट्या बनवण्यासाठी खवणी वापरा. आता हे तयार केलेले फ्लेक्स ५-६ वेळा स्वच्छ पाण्यात टाका आणि त्यातील स्टार्च काढून टाका. स्टार्च काढून टाकल्याने, बटाटा कमी तेल शोषेल आणि नमकीन बराच काळ कुरकुरीत राहील. आता पाण्यातून फ्लेक्स काढा आणि त्यात दोन लिंबाचा रस घाला आणि हलक्या हातांनी फ्लेक्सवर पसरवा. यानंतर, लिंबू-मिश्रित फ्लेक्सवर गरम पाणी घाला आणि त्यांना फक्त पाच मिनिटे झाकून ठेवा; आता ते गाळून चाळणीत काढा आणि जास्तीचे पाणी निथळल्यानंतर ते कापडावर पसरवा. बटाट्याच्या पट्ट्या पूर्णपणे कोरड्या असाव्यात. आता पॅनमध्ये शेंगदाण्याचे तेल गरम होऊ द्या. गरम तेलात काही फ्लेक्स घाला व तळून घ्या. तसेच तुम्ही शेंगदाणे देखील तळून चिवड्यामध्ये टाकू शकतात. आता एका बाऊलमध्ये काढून आमसूल पूड मीठ, जिरे पूड, मिरे पूड घाला. तसेच तुम्हाला तिखट आवडत असल्यास तुम्ही तिखट देखील घालू शकतात. व चांगल्या प्रकारे मिक्स करा. तुम्हाला आवडत असल्यास तुम्ही वरून काजू, मनुके देखील घालू शकतात. तर चला तयार आहे आपली उपवास रेसिपी बटाटा चिवडा, नक्कीच सर्व्ह करा.

# 'दिंडी सजगतेची - आपत्ती व्यवस्थापनाची'
## संकल्पनेचा चित्ररथ, वारीत ठरतोय लक्षवेधी



### आपत्ती व्यवस्थापन विभागाची वारीतील जनजागृतीची प्रभावी मोहीम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : पंढरपूर आषाढी वारी ही महाराष्ट्राची धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक एकतेची शान असलेली परंपरा आहे. याच पवित्र वारीत राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने एक अभिनव आणि स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे – "दिंडी सजगतेची – आपत्ती व्यवस्थापनाची". मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली, राज्य शासनाने या उपक्रमाच्या माध्यमातून वारीमध्ये सहभागी लाखो वारकऱ्यांमध्ये आपत्ती विषयक सजगता निर्माण करण्याचे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

वारीमध्ये आकर्षक पद्धतीने सजवलेले चित्ररथ, पथनाट्य पथक, माहितीपूर्ण स्टॉल्स, मोबाईल वॅन आणि जनतेस सुलभ भाषेतील माहितीपत्रके वापरून पूर, चक्रीवादळ, दुष्काळ, गर्दी नियंत्रण यासारख्या आपत्तींविषयी माहिती दिली जात आहे. "संकटाला घाबरू नका, सज्ज राहा" असा सकारात्मक संदेश देत ही दिंडी वारकऱ्यांचे लक्ष वेधून घेत आहे. दिनांक १९ जून पासून वारी बरोबर प्रारंभ झालेला या संकल्पनेसाठी ४ चित्ररथ असून ६० लोकांची टीम यामध्ये सहभागी झाले आहे. दिनांक ६ जुलै आषाढी एकादशी पर्यंत या चित्ररथाद्वारे व्यापक स्वरूपात जनजागृती करण्यात येत आहे.

चित्ररथावर विठ्ठल-रखुमाईंची छायाचित्रे, वारकरी परंपरेचे दर्शन, तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध उपाययोजनांचे चित्ररूप दर्शन घडते. यामुळे ही संकल्पना अध्यात्मिक श्रद्धेच्या सोबतीने सुरक्षिततेची जाणीव देखील देत आहे. वारीत ज्ञानेश्वर माऊली आणि संत तुकाराम महाराज यांच्या दोन प्रमुख पालख्यांच्या मागोमाग गावागावातील लहान-मोठ्या दिंड्या सहभागी होत असतात. ही संपूर्ण वारी जिथे भक्तिभाव, कीर्तन, रिंगण, अभंग गजरात रंगलेली असते, तिथेच ही "दिंडी सजगतेची" आपत्ती व्यवस्थापनाची माहिती घेऊन शांतपणे आपले कार्य करत आहे.

वारकऱ्यांनी या चित्ररथांचे आणि माहिती स्टॉल्सचे स्वागत केले असून, "सजग व सुरक्षित वारी" ही संकल्पना सर्वांच्या मनात घर करत आहे.राज्य शासनाचा स्तुत्य उपक्रम हा उपक्रम म्हणजे आपत्ती व्यवस्थापन आणि जनतेच्या सहभागाचा उत्कृष्ट संगम आहे. लाखो वारकऱ्यांचे या निमित्ताने आपत्ती व्यवस्थापन बाबत प्रबोधन होत आहे.



## आजचे राशि भविष्य

**मेष**
राजकीय कार्ये पूर्ण होतील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. आरोग्य उत्तम राहील. मनोरंजनावर खर्च होईल. कामात स्थिती सुखद राहील.

**वृषभ**
नवीन करार होतील. आरोग्य उत्तम राहील. महत्वाच्या कामांमध्ये सुरळीतरीत्या सहयोग मिळेल. कौटुंबिक वातावरण आनंदाचे राहील. मान-

**मिथुन**
सन्मानात इच्छानुरूप वाढ होईल. प्रेम संबंधांमध्ये स्थिती होकारात्मक राहील. मित्रांच्या मदतीने कार्ये पूर्ण होतील. दिवस आनंदात व्यतीत होईल.

**कर्क**
राजकीय कार्ये होतील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. पत्नीपासून लाभ मिळेल. कौटुंबिक विषयांमध्ये सहयोग द्यावा लागू शकतो.

**सिंह**
. शत्रू पराभूत होतील. व्यापार-व्यवसायात सुखद स्थितीचे वातावरण राहील. वैवाहिक सुख वाढेल. नोकरपेशा व्यक्तींसाठी काळ चांगला आहे.

**कन्या**
आरोग्याच्या दृष्टीने काळ अनुकूल आहे.कौटुंबिक विषयांमध्ये वेळ चांगला जाईल. व्यापार-व्यवसायात स्थिती अनुकूल राहील. आरोग्य उत्तम राहील.

**तूळ**
मित्रांचा आधार घेऊन कार्य करा. व्यापार-व्यवसायात स्थिती नरम-गरम राहील. प्रवास काळजीपूर्वक करा. काहीकाळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल.

**वृश्चिक**
कौटुंबिक विषयांमध्ये वेळ अनुकूल राहील. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. ध्येयाची पूर्ती आपणास करायची आहे ते लक्ष्य निर्धारीत करा.

**धनु**
आपल्या मनात असलेल्या योजनेबद्दल अतिउत्साही आहात. न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल.

**मकर**
व्यापार-व्यवसाय सुरळीत राहील. मान-सन्मानात वाढ होईल. दिवस जोमदार ठरेल. आपला विधायक दृष्टीकोण इतरांबरोबर समन्वय साधण्यात मदत करतो.

**कुंभ**
क्रोधावर संयम ठेवा आणि सहकाऱ्यांबरोबर वादाची स्थिती टाळा.आर्थिक नुकसानीची शक्यता आहे. आपली बेपर्वाई आपणासमोर अनपेक्षित प्रश्न उभे करेल.

**मीन**
धार्मिक भावना वाढेल. सामाजिक कार्यांमध्ये अनुकूल सहयोग मिळेल व सन्मान वाढेल. राजकीय व्यक्तींसाठी स्थिती संतोषदायक राहील.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नलिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# केडीएमसीच्या ६१ शाळांमध्ये पायाभूत चाचणीला सुरवात

## आयुक्त अभिनव गोयल यांनी केली पाहणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार शिक्षण विभागाने शिक्षण विभागाच्या अधिकारी व शिक्षकांच्या मदतीने महापालिकेच्या शाळांचा पूर्णत: कायापालट करण्यासाठी कंबर कसली आहे. यावर्षी शाळा प्रवेशा दिवशीच विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तके पुरविण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे गणवेश, बुट, दफ्तरे इ. आवश्यक सुविधा देखील वर्षाच्या सुरवातीला पुरविण्याचे नियोजन आहे. महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांचा बौधिक स्तर वाढविण्यासाठी त्यांची शैक्षणिक प्रगती पाहण्यासाठी महापालिकेच्या सर्व शाळांतून विद्यार्थ्यांच्या पायाभूत चाचणीस आज प्रारंभ झाला आहे.



महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या आदेशान्वये प्रत्येक शाळानिहाय पालक अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली असून, या पालक अधिकाऱ्यांनी स्वत: शाळेत जावून, शाळेत घेण्यात आलेल्या पायाभूत चाचणीची पाहणी केली. महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी पालकत्व स्विकारलेल्या सिंडेकेट येथील शाळा क्र. 95/8 या ऊर्दु शाळेतील, तसेच बारावे येथील शाळा क्र. 68 आणि बारदान गल्ली येथील ऊर्दु व मराठी शाळेस समक्ष भेट देवून शाळेत चाललेल्या पायाभूत चाचणी परिक्षेची पाहणी केली. तसेच स्वत: खडू हातात घेवून विद्यार्थ्यांना शिकवण दिली.

महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांचा बौधिक स्तर वाढविण्याच्या दृष्टीकोनातून ही पायाभूत चाचणी घेतली जात असून, यानंतर सर्व शिक्षकांसाठी शिक्षण परिषदेचे आयोजन केले जाणार आहे आणि या शिक्षण परिषदेमध्ये विद्यार्थ्यांचा बौधिक स्तर वाढविण्याच्या दृष्टीकोनातून करावयाच्या विविध प्रकारच्या उपायांच्या अंमलबजावणीबाबत ऊहापोह केला जाणार आहे. यापुढे महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख उंचाविण्यासाठी दरमहा पायाभूत चाचणी घेवून, बौधिक स्तर वाढविण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न केले जातील. महापालिकेच्या या अभिनव संकल्पनेचे शिक्षकांनी देखील कौतुक केले आहे.

### भाजपा सरचिटणीस

# रवींद्र पाटील यांचा वाढदिवस संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : डोंबिवली ग्रामीण, भारतीय जनता पार्टीचे सरचिटणीस, आणि निळजे ग्रामपंचायतचे माजी सरपंच रवींद्र धर्मा पाटील यांचा वाढदिवस लोढा हेवन येथील त्यांच्या कार्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. निळजे गाव ,लोढा, पलावा येथील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते,मित्रमंडळी आहे सर्व नातेवाईक मंडळींनी रवींद्र



धर्मा पाटील यांचा वाढदिवस त्यांच्या कार्यालयात केक कापला. यावेळी आलेल्या अनेक हेचिंतकांनी रवींद्र धर्मा पाटील यांना केक भरवुन,पुष्पगुच्छ आणि शुभेच्छा दिल्या.

या वाढदिवसाच्या कार्यक्रमात सामाजिक, राजकीय, आणि शैक्षणिक, क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती

रवींद्र धर्मा पाटील हे धर्मराज फाउंडेशन या सामाजिक संस्थेचे संस्थापक , कार्याध्यक्ष असून यांच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम गोरगरिबांसाठी राबवत असतात आणि या वाढदिवसाच्या दिवशी आरोग्य शिबिर, मोफत नेत्रचिकित्सा आणि चष्मे वाटप कार्यक्रम करण्यात आले.


महाराष्ट्र शासन

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**ई मेल पत्ता :** thane2.ee@mahapwd.gov.in  **दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :-** ०२२-२५३६१३९३

**ई निविदा सुचना क्रमांक १३ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र. २, ठाणे जिल्हा ठाणे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वर्गातील फक्त नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर मागवित आहेत.

निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्याकरिता उपलब्ध आहेत. (वरीलपैकी काही अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र.२, ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.)

**कामाचे नांव :**

१) उल्हासनगर तालुक्यातील शिरवली येथे कमान (दिशा दर्शक फलक) सुशोभिकरण करणे.
(२५१५ ग्राम विकास कार्यक्रम), अंदाजित किंमत :- रु.१६,४१,५३७/-
२) उल्हासनगर तालुक्यातील चिरड येथे कमान (दिशा दर्शक फलक) सुशोभिकरण करणे.
(२५१५ ग्राम विकास कार्यक्रम), अंदाजित किंमत :- रु.१६,४१,५३७/-
३) उल्हासनगर तालुक्यातील डावळपाडा येथे कमान (दिशा दर्शक फलक) सुशोभिकरण करणे.
(२५१५ ग्राम विकास कार्यक्रम), अंदाजित किंमत :- रु.१६,४१,५३७/-
४) उल्हासनगर तालुक्यातील बोहनोली येथे कमान (दिशा दर्शक फलक) सुशोभिकरण करणे.
(२५१५ ग्राम विकास कार्यक्रम), अंदाजित किंमत :- रु. १६,४१,५३७/-
५) शहापुर तालुक्यातील मौजे कातबाव रस्त्यावर साकव बांधणे. (डिपीडिपी साकव कार्यक्रम), अंदाजित किंमत :- रु.२४,५७,४१९/-
६) उल्हासनगर-३ येथील तांत्रिक विद्यालय उल्हासनगर येथे अंतर्गत रस्त्याचे काँक्रिटीकरण करणे.
(डिपीडीसी वर्क),अंदाजित किंमत :- रु.२४,७८,३७८/-
७) शहापुर तालुक्यातील जांभे धरण परिसरात पर्यटन विकास अंतर्गत सोयी सुविधा करणे.
(पर्यटन विकास कार्यक्रम),अंदाजित किंमत :- रु. ४१,३८, ६१२/-
८) शहापुर तालुक्यातील मौजे चांग्याचापाडा साकडबाव बाबरे येथील मुमरी नदीजवळ पुलाला संरक्षक भिंत बांधणे.
(डिपीडिसी साकव कार्यक्रम),अंदाजित किंमत :- रु. ४१,२६,३६५/-

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि. ०४/०७/२०२५ ते दि. ११/०७/२०२५
ई-निविदा उघडणे : दि. १४/०७/२०२५

**खालील संकेतस्थळांवर ई-निविदांची सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१) http://mahapwd.com
२) http://mahatenders.gov.in (सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील संकेतस्थळांवर कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र. २, ठाणे कार्यालयातील सूचना फलक
४) ई निविदा पोर्टलवर बीड लॉक झाल्यानंतर निविदांबाबत निविदेमध्ये नमुद कागदपत्रांच्या हार्ड कॉपी १ (एक) प्रतीत कंत्राटदारांनी निविदा सुचनेनुसार नमुद वेळेपूर्वी सादर करणे अनिवार्य राहिल.

**जा.क्र.१ : साबांविक्र.२/ठाणे/ई-निविदा/२०२५-२६/४५५१**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग क्र.२, ठाणे,**
**पार्किंग प्लाझा बिल्डींग,९ वा मजला, सर्विस रोड,**
**पूर्व द्रुतगती महामार्गलगत ज्युपिटर हॉस्पीटल जवळ, ठाणे- ४००६०१.**
**दिनांक : २७/०६/२०२५**

**जा क्र २ : आरओसी-२०२५-२६/क्र-५/C१४३२**

**सही /-**
**कार्यकारी अभियंता**
**सा.बां. विभाग क्र.२, ठाणे**


# कल्याण पश्चिमेत चाळीतील घरात लागली आग

## घरातील सामान जळून खाक : दोन जण जखमी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पश्चिमेतील वल्लीपीर रोड परिसरात एका चाळीतील घराला आग लागल्याची घटना सोमवारी संध्याकाळी घडली. दैव बलवत्तर सुदैवाने जिवितहानी टळली.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार कल्याण पश्चिमेतील वल्लीपीर रोड परिसरातील चाळीतील घराला सोमवारी संध्याकाळी चार साडेच्या चार सुमारास आग लागल्याची घटना घडली. या आगीत घरातील सामान जळून खाक झाले. तर दोन जण जखमी झाले असून त्यांना उपाचार्थ तातडीने रूग्णालयात नेले. घटनास्थळी तातडीने कल्याण डोंबिवली अग्निशमन दलाच्या बंबाने पोहचत अग्निशमन दलाच्या जवानांनी पाणी मारून आग विझवली. दरम्यान घरात आग लागली तेव्हा आजूबाजूच्या लोकांनी घरातून सिलेंडर बाहेर काढले.

या आगीत दोन जण किरकोळ जखमी असल्याची माहिती फायर ब्रिगेडचे अग्निशमन केंद्र प्रमुख अधिकारी विनयाक लोखंडे यांनी दिली आहे. नेमकी आग कशाने लागली हे समजले नसून या घटनेत घरातील सामान जळून खाक झाल्याने 3लाख रू मालमत्तेचे नुकसान झाले असल्याचे घर मालकाचे म्हणणे असल्याचे लोखंडे यांनी सांगितले.

# कल्याण शहरात श्री जगन्नाथ रथयात्रा

## शेकडो भाविकांची मोठी गर्दी



### माजी आमदार नरेंद्र पवार आणि हेमलता पवार यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून रथयात्रेला प्रारंभ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण** : पुरी येथील श्री जगन्नाथ मंदिर आणि तिथली रथयात्रा ही केवळ देशामध्ये नव्हे तर संपूर्ण जगभरात प्रसिद्ध आहे. या पुरी येथील श्री जगन्नाथ रथयात्रेच्या प्रेरणेने कल्याणात निघालेल्या श्री जगन्नाथ रथयात्रेलाही मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. कल्याण पश्चिमेचे माजी आमदार नरेंद्र पवार आणि कल्याण विकास फाउंडेशनच्या अध्यक्ष हेमलता पवार यांच्या हस्ते आरती करून मग श्रीफळ वाढवून या रथयात्रेला प्रारंभ झाला. पुरी येथील श्री जगन्नाथ मंदिर आणि तिथल्या रथयात्रेची संपूर्ण जगभरात ख्याती आहे. ही रथयात्रा आणि इथल्या मंदिरात श्री जगन्नाथाचे दर्शन घेण्यासाठी देशभरातून लाखो भक्त येत असतात. ते विचारात घेऊन कल्याण पश्चिमेतील अमृत पार्क येथील इस्कॉन केंद्रातर्फे यंदा कल्याणात श्री जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. येथील पारनाका श्रीराम मंदिर येथून निघालेली ही रथयात्रा लालचौकी, मोहिंदर सिंग मार्ग, मोहन हाईटस, वायले नगर, पोद्दार स्कूलमार्गे अमृत पार्क येथील इस्कॉन केंद्र येथे या रथयात्रेचा समारोप करण्यात आला.विशेष म्हणजे पुरी येथील श्री जगन्नाथ रथयात्रेप्रमाणेच कल्याणातील ही रथयात्राही काढण्यात आली. ज्यामध्ये श्री जगन्नाथ आणि श्रीकृष्ण यांच्या जयघोषाने संपूर्ण कल्याण नगरी दुमदुमून गेली होती. कल्याणात प्रथमच निघालेल्या या रथयात्रेमध्ये शेकडो भाविक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.

यावेळी कल्याण पश्चिमेतील इस्कॉनकेंद्राचे प्रमुख अनिरुध्द भगवान दास, प्रभानु दास, सीए उत्कर्ष मेहता, सीए निर्मल सिंग , माजी आमदार नरेंद्र पवार, कल्याण विकास फाउंडेशनच्या अध्यक्ष हेमलता पवार, भाजपच्या प्रदेश सचिव प्रिया शर्मा यांच्यासह इस्कॉनचे अनेक सदस्य आणि भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी नगरसेविका वृषाली जोशी यांच्याकडून विद्यार्थ्यांचा गुणगौरव..



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : डोंबिवली पश्चिमेकडील देवी चौकात सौ सौ.वृषाली रणजीत जोशी आणि श्री रणजीत रामदास जोशी यांच्या कार्यालयात कामगारांना मिळणाऱ्या शासकीय सुविधांचा लाभ कामगारापर्यंत पोहोचवण्या करिता मार्गदर्शन शिबिर, आणि दहावी बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव कार्यक्रम आयोजित केला होता.

या भरगच्च कार्यक्रमात नाका कामगारांना शासनाकडून मिळणाऱ्या सुविधांसाठी अर्ज भरून घेण्यात आले हे अर्ज मंजूर झाल्यावरती सुरक्षित काम करणे करता शासनाकडून मिळणारे किट, आणि गृह उपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात येईल, प्रभागातील दहावी बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळयात विद्यार्थ्यांना शालेय दप्तर आणि, प्रमाणपत्र ठेवण्याकरिता फोल्डर या शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले.

यावेळी सौ. वृषाली रणजीत जोशी अनेक मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# पडघ्यात साकीब नाचणचा दफनविधी






दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : दहशतवादी कारवाया मध्ये सहभागी व महाराष्ट्र इसीस मॉड्युल प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणांच्या ताब्यात असलेला व मुंबई साखळी बॉम्बस्फोटातील आरोपी दहशतवादी साकीब नाचण याचा भिंवडी तालुक्यातील पडघा येथील मुस्लिम कब्रस्थानात दफनविधी पार पडला.

भिंवडी तालुक्यातील बोरीवली येथील रहिवासी दहशतवादी साकीब नाचण याला दहशतवादी कारवायासाठी सहभाग व महाराष्ट्र इसीस मॉड्युल प्रकरणी ईसीस मॉड्युल म्होरक्या म्हणून २०२३ मध्ये राष्ट्रीय तपास यंत्रणांनी ताब्यात घेतले होते तेव्हांपासून तो दिल्ली येथील जेलमध्ये होता सोमवार दिनांक २३ जुन रोजी त्याची तब्येत बिघडल्याने त्याला दिल्ली येथील एका सरकारी इस्पितळात दाखल करण्यात आले





होते. ब्रेन हॅमरेजमुळे उपचारादरम्यान २८ जुन रोजी त्याचा मृत्यू झाला. त्याचे पार्थिव भिंवडी तालुक्यातील बोरीवली येथील त्याच्या राहत्या घरी रविवारी मध्यरात्री आणण्यात आले होते. सोमवारी सकाळी मुस्लिम रितीरिवाजानुसार पडघा येथील कब्रस्थानात दफनविधी पार पडला यावेळी पंचक्रोशीतील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर सोमवारी सकाळपासूनच साकीब यांच्या दफनविधीसाठी मुस्लिम बांधव बोरीवली येथे दाखल झाले होते.दफनविधी दरम्यान बोरीवली व परिसरातील मुस्लिम बांधवांनी आपले व्यवहार बंद ठेवले होते. तर साकीब राहत असलेल्या नाचण मोहल्ल्यात तणावपूर्ण शांतता होती. खबरदारीचे उपाय म्हणून स्थानिक व ठाणे ग्रामीण पोलीसांनी पडघा बोरीवली गावातील नाक्या नाक्यावर व मुबंई नाशीक महामार्गावरून बोरीवली येथे जाणाऱ्या रस्त्यावर पोलीस बंदोबस्त ठेवला होता. व जाणाऱ्या येणाऱ्यां वाहनांची कसुन चौकशी केली जात होती तर कब्रस्थान परिसरात चोख बंदोबस्त पोलीसांकडून ठेवण्यात आला होता या बंदोबस्तासाठी स्थानिक पोलीसांसह ठाणे ग्रामीण पोलीसांच्या वेगवेगळ्या तुकड्या तैनात करण्यात आल्या होत्या उच्चशिक्षित असलेला साकीब नाचण हा सुरुवातीला बंदी घातलेल्या सिमी या दहशतवादी संघटनेचा प्रमुख पदाधिकारी होता. तर २००३ मधील मुलुंड, विलेपार्ले, मुंबई सेंट्रल या मुंबई साखळी बॉम्बस्फोटातील मुख्य आरोपी होता. या स्फोटात १३ निरपराध नागरीकांचा मृत्यू तर १४७ सर्वसामान्य नागरीक गंभीर जखमी झाले होते. तसेच देशविरोधी व दहशतवादी कारवायासाठी सहभाग व असल्याने साकीब नाचण यांच्यावर वेगवेगळे गुन्हे दाखल होते. तर त्याच्या संपर्कात आलेल्या तरुणांचे ब्रेन वॉश करुन देशविरोधी कारवायांसाठी तो प्रवृत्त करीत होता.

# खर्डीला मिळाला पूर्णवेळ ग्रामविकास अधिकारी

## मनसेचा दणका



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर** : शहापूर तालुक्यातील खर्डी ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी मंगल परमार यांच्याकडे खर्डी व अजनुप या दोन ग्राप कार्यभार असल्याने त्यांना खर्डी ग्राप मधील नागरिकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी वेळ मिळत नसल्याने अनेक नागरिकांची कामे रखडत होती त्यामुळे नागरिकांना रोज दाखले व इतरकामांसाठी हेलपाटे मारावे लागत होते.याबाबत मनसेचे खर्डी शहराध्यक्ष सगीर शेख व उपाध्यक्ष प्रकाश धाबे यांनी शहापूरच्या गटविकास अधिकाऱ्याकडे लेखी तक्रार करून खर्डी ग्राप करिता पूर्णवेळ ग्रामविकास अधिकारी देण्याची मागणी केली होती. या मागणीची दाखल घेत तत्कालीन गटविकास अधिकारी नम्रता जगताप यांनी शहापुरात नव्याने रुजू झाले ग्रामविकास अधिकारी दीपक साबळे यांची खर्डी ग्रापला नेमणूक केली. त्यामुळे नागरिकांना आपल्या समस्या सोडवण्यासाठी पूर्णवेळ ग्रामविकास अधिकारी मिळाल्याने समाधान व्यक्त होत असून रहिवाशी मनसेला धन्यवाद देत आहेत.नव्याने रुजू झालेले ग्रामविकास अधिकारी साळवे यांनी खर्डी ग्रापचा कारभार स्वीकारल्यावर मनसेचे शहरप्रमुख सगीर शेख, उपविभाग अध्यक्ष प्रकाश धाबे,चिटणीस संजय वाढविंदे, महिला विभाग अध्यक्ष रुक्मिणीबाई वाडेकर व ग्राप जेष्ठ क्लर्क हर्षद कांबळेआणि मनसे पदाधिकारी उपस्थित होते

## ३९ वर्षांच्या सेवेनंतर सुरेश दीक्षित रेल्वे सुरक्षा दलातून सेवानिवृत्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** रेल्वे सुरक्षा दलात ३९ वर्षे सेवा दिल्यानंतर सहाय्यक उप निरीक्षक सुरेश दीक्षित हे आपल्या कर्तव्यातून सेवानिवृत्त झाले आहेत. ३० जून रोजी त्यांचा निरोप समारंभ पार पडला. आरपीएफ मध्ये कार्यरत असताना त्यांनी ३९ वर्षांत हजारो माणसे जोडली. त्यांच्या सेवानिवृत्ती करिता तसेच पुढील आयुष्यासाठी खर्डीकर क्लासेसचे संथापक डॉ. सुनील खर्डीकर यांनी देखील शुभेच्छा दिल्या आहेत. आरपीएफ सहाय्यक उप निरीक्षक सुरेश दीक्षित यांनी खर्डीकर क्लासेसला भेट दिली होती. यादरम्यान डॉ.सुनील खर्डीकर यांनी सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला. यावेळी उप निरीक्षक आर के मिश्रा, सुरेश वाव्हळ देखील उपस्थित होते. तुम्ही इतकी वर्षे आरपीएफ मध्ये सेवा दिलीत. गोर गरीब व गरजूंनाही मदत करीत आला आहात. अधिकारी म्हणून कर्तव्य बजावत असताना दुसरीकडे माणूस म्हणून माणुसकी देखील जपलीत. त्यामुळे निवृत्ती नंतरचे तुमचे पुढील आयुष्य सुखकर होवो अशा शुभेच्छा खर्डीकर यांनी दिल्या. सुरेश दीक्षित यांनी ३९ वर्षांत कल्याण, डोंबिवली, मुलुंड, दादर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, शिवडी, भुसावळ, मनमाड, शिर्डी, कोपरगाव आदी ठिकाणी आपले कर्तव्य बजावले आहे. डॉ.सुनील खर्डीकर यांनी दिलेल्या सन्मानाबद्दल दीक्षित यांनी खर्डीकर यांचे आभार व्यक्त केले. माझ्या प्रमाणे आपण देखील शिक्षण क्षेत्रात तीन दशके कार्यरत आहात. इतक्या वर्षांत आपणही हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविले आहे याबाबद्दल मलाही तुमचा अभिमान आहे असे यावेळी सुरेश दीक्षित म्हणाले.

## सौ. रेखा चौधरी यांच्या कार्यालयात 'कामगार कार्ड' कार्यक्रम संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली(शरद शहाणे) :** भारतीय जनता पार्टी हक्काची कामगार मजूर संघटने तर्फे कचोरे, गाव प्रभाग क्रमांक 45 च्या माजी नगरसेविका सौ. रेखा चौधरी यांच्या कार्यालय प्रांगणात राज्य शासनाकडून कामगार आणि नाका कामगार यांच्यासाठी मिळणाऱ्या सुविधा कामगारांपर्यंत पोहोचवण्याकरता अर्ज भरून घेण्यात आले. हे अर्ज सरकारी कार्यालयातून मंजूर झाल्यावर नाका कामगार सुरक्षा कवच किट, तसेच महिलांना गृह उपयोगी भांडी, विवाहासाठी, बाळंतपणासाठी, शिक्षणासाठी मिळणारा निधी आणि अनेक सुविधा सर्वसामान्य कामगारांपर्यंत पोहोचवण्याचे काम भारतीय जनता पार्टी हक्काची मजदूर संघटनाने तर्फे हा कार्यक्रम करण्यात आला.

या कार्यक्रमात माजी नगरसेविका सौ. रेखा चौधरी , भारतीय जनता पार्टी कल्याण जिल्हाध्यक्ष नंदकिशोर घनश्याम परब, आणि संस्थापक अध्यक्ष,महादूसिंग(राणा शेठ) माहेर सचिव ज्ञानेश्वर शेजुळ.वंदना राजपूत, महिला आघाडी अध्यक्ष मनीषा सोनकर, अशाअनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

## 'इतिहास लिहीणाऱ्यांनी आपल्याच लोकांची सोय पाहिल्याने तो सत्यापासून दूर'

**-प्रा. रवींद्र पाटील**


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** शिवप्रभूंचा इतिहास असो की अन्य कोणता; जो समाज आधी शिक्षित होता त्या समाजाने अन्य अल्पशिक्षित समाजाच्या भाबडेपणाचा गैरफायदा घेऊन आपल्या लोकांच्या सोयीचा इतिहास लिहिला व सगळयांच्या माथी मारला. कृष्णाजी भास्कर व अन्य तत्कालिन मतलबी लोकांची आडनावे कुणी व का लपवली? असा सवाल शिवव्याख्याते प्रा. रवींद्र पाटील यांनी केला. ऐरोली येथील श्री संत सावता माळी समाज मंडळ आणि सिनियर सिटीझन हेल्थकेअर फाऊन्डेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राजमाता जिजाई यांच्या स्मरणार्थ "शिवबा राजं छत्रपती झालं रं" या व्याख्यानांतर्गत ते २९ जून रोजी बोलत होते.




अनेक गोष्टी आपल्याला मूळ स्वरुपात सांगितल्याच गेल्या नाहीत. पण नंतर समाज शिकला, वाचू लागला, पुरावे धुंडाळू लागला व त्यांना वास्तव कळले असे सांगून प्रा. पाटील म्हणाले की विद्येचे माहेरघर मानल्या गेलेल्या पुण्याची विद्या आता नवी मुंबई, ठाणे, रायगड, धुळे, जळगाव, विदर्भ, मराठवाडा येथेही गेली असल्याने सर्वांचे डोळे लख्ख उघडले आहेत. प्रा.पाटील यांनी नवतरुणांना आवाहन केले की कपाळावर चंद्रकोर कोरणाऱ्या मुलींनी आधी स्व-संरक्षणाची कला शिकून घ्यावी व अंगाशी येणाऱ्या बदमाशांना जागीच लोळवावे व ज्यांना अंगावर शिवप्रभूंचे टॅटू कोरायचे आहेत, बुलेट आणि कारवर शिवरायांची प्रतिमा कोरायची आहेत, त्यांनी ती जरुर कोरावी; पण मग त्या शरीराला कोणत्याही विडी, सिगरेट; दारुचा स्पर्श होऊ देता कामा नये.

माता-भगिनींना त्यांच्यापासून अप्रत्यक्षरित्याही उपद्रव होणार नाही याची काळजी घेतली जावी. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रंगकर्मी रवींद्र औटी यांनी केले. श्री संत सावता माळी समाजाचे अध्यक्ष सुर्यकांत थोरात यांनी मंडळाच्या उपक्रमांची माहिती आपल्या प्रास्ताविकातून दिली. याप्रसंगी अलीकडेच जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित झालेले पत्रकार राजेंद्र घरत तसेच नवी मुंबई महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी महेंद्र कोंडे, ज्येष्ठ रांगोळी कलावंत श्रीहरी पवळे यांचा सन्मान करण्यात आला. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सभागृहात भरगच्च हजेरी लावून या व्याख्यानातून शिवविचारांची धग अनुभवल्याचे पाहायला मिळाले.




## ठाणे जिल्हा परिषद माध्यमिक अधिक्षक पदी विजयकुमार सोनवणे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्हा परिषद माध्यमिक. शिक्षण विभाग अधीक्षक संजय राऊत यांची प्रशासकीय बदली झाल्याने ठाणे जिल्हा परिषद माध्यमिक अधीक्षक या रिक्त झालेल्या पदावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था राहटोली येथे कार्यरत असलेले विजयकुमार सोनवणे यांची ठाणे जिल्हा परिषद माध्यमिक अधीक्षक पदावर नियुक्ती झाल्यामुळे दि.27 जून 2025 रोजी विजयकुमार सोनवणे यांनी प्रत्यक्ष हजर राहून अधीक्षक पदाचा कार्यभार स्विकारला आहे.

यावेळी सहा. प्रशासन अधिकारी ए. पी.राठोड, लिपिक प्रशांत कसबे, निलेश मुटके व सर्व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.अधीक्षक पदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर अधीक्षक सोनवणे यांनी सर्वाचा परिचय करून घेतला व कामाचे नियोजन समजावून घेतले. सहा. प्रशासन अधिकारी ए. पी.राठोड यांनी प्रास्ताविक करून कार्यालयातील कामकाजाची माहिती दिली.

## ठाणे जिल्हा देशमुख मराठा समाजाच्या अध्यक्ष पदी विलास देशमुख

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील सह्याद्री पर्वत रांगांच्या कुशीत असलेल्या न्याहाडी गावचे भूमिपुत्र एक शेतिनिष्ठ शेतकरी असलेले विलासकाका देशमुख यांची ठाणे जिल्हा देशमुख मराठा समाजाच्या अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे.

विलास देशमुख हे संपुर्ण मुरबाड तालुक्यात काका म्हणून सुपरिचित आहेत. स्वभावाने मृदू व प्रेमळ असलेले विलासकाकांना समाजसेवेची प्रचंड आवड आहे. सर्व जाती धर्माच्या लोकांमध्ये सुख दुःखात त्यांचा सहभाग असतो. ते स्वतः एक व्यावसाईक असून मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांचे ते खंदे समर्थक देखील आहेत.

देशमुख मराठा समाजाच्या ठाणे जिल्हा अध्यक्ष पदी त्यांची नियुक्ती झाल्याने निश्चितच मराठा समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडतील व न्याय देतील अशा प्रतिक्रिया जनतेतून येत आहेत. त्यांच्या या निवडीने संपुर्ण ठाणे जिल्ह्यातून त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

## पोलिसांनी शाहनिशा केल्याशिवाय विनयभंगाचे गुन्हे दाखल करू नये - आमदार विश्वनाथ भोईर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याणमध्ये शिवसेना शिंदे, गटातील माजी नगरसेवक मोहन उगले, यांच्यावर झालेल्या विनयभंगाच्या आरोपानंतर राजकीय वातावरण तापलं आहे. या प्रकरणात मोहन उगले, यांची प्रतिमा धुळीस मिळवण्यासाठी त्यांना सॉफ्ट टारगेट केलं जात असल्याचा आरोप खुद्द कल्याण पश्चिम शिवसेना शिंदे गटाचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी पत्रकार परिषदेत केला.

ज्या महिलेनं ही तक्रार केली, ती कधीही मोहन उगलेना भेटलेली नाही, ना त्यांच्यात फोनवर संवाद झालेला आहे. मग विनयभंग कसा आणि कुठे झाला? पोलिसांनी आधी शहानिशा करून गुन्हा दाखल करायला हवा होता, जर मोहन उगले, दोषी ठरले तर पक्षातून हकालपट्टी करु, पण जर आरोप खोटे ठरले, तर अशा महिलांवर कठोर कारवाई झाली पाहिजे.

### आमदारांची पोलिसांच्या कार्यपद्धतीवर शंका

पोलिसांनी सामान्य महिलांच्या तक्रारींवर कारवाईसाठी दहा-दहा दिवस लावले जातात, पण प्रतिष्ठित नगरसेवकांवर काही तासांत गुन्हा दाखल होतो, ही दुजाभावाची



वागणूक का? असा सवालही आमदार विश्वनाथ भोईर यांनी केला.

याशिवाय या प्रकरणाची माहिती लवकरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्यापर्यंत पोहोचवणार

### गुन्हा दाखल करणाऱ्या महिलेची देखील चौकशी करण्याची केली मागणी

असल्याचंही आमदार विश्वनाथ भोईर यांनी स्पष्ट केलं आहे. तर राजकीय आकसापोटी आपल्यावर असे गुन्हे दाखल केले जात असून येथील चार प्रभागात माझे काम चांगले आहे. निवडणुकीत मला हरवणे विरोधकांना जमत नसल्याने महिलांना पुढे करून अशाप्रकारे आपल्यावर खोटे गुन्हे दाखल करत असल्याची प्रतिक्रिया माजी नगरसेवक मोहन उगले यांनी दिली.

## सेवा सहयोग फाऊंडेशनच्या वतीने शालेय साहित्य वाटप !



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील) :** सेवा सहयोग फाऊंडेशन, मुंबई या फाउंडेशनच्या वतीने श्री साईकृपा कै.मो.सु. पिसाळ विद्यालय, जांभूळ या शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

सेवा सहयोग या फाउंडेशनच्या माध्यमातून अनेक ठिकाणी विविध उपक्रम राबविले जात आहेत. या अनुषंगाने या शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तरासहित असलेले (स्कूल किट) शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमावेळी सेवा सहयोग फाऊंडेशनचे वरिष्ठ कार्यक्रम व्यवस्थापक दिपालीताई देवळे, फाऊंडेशन पदाधिकारी रामदादा रोकडे, संदीप पवार, जयदेवी भवानी महिला मंडळ, जांभूळ संस्था पदाधिकारी तेजस पिसाळ, शाळेचे मुख्याध्यापक भगिरथ धोंगडे आदी पदाधिकारी व शिक्षक -शिक्षिकेतर, कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यार्थी हितासाठी शाळा बंद आंदोलन मागे घ्या : ठाणे महापालिकेचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** शिक्षण हक्क अधिनियम २००९अन्वये कोणत्याही संस्थेस अथवा शाळेस विद्यार्थ्यांना त्यांच्या मुलभूत शैक्षणिक हक्कांपासून वंचित ठेवता येत नाही. तसेच, अनधिकृत शाळांवर पुढील कायदेशीर कारवाई करण्यासाठी ठाणे महापालिका प्रशासन कसोशीने पाठपुरावा करत आहे. त्यामुळे, आपल्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता आपण आपले आंदोलन कृपया तात्काळ मागे घ्यावे आणि प्रशासनास सहकार्य करावे, अशी विनंती इंडिपेंडेंट स्कूल संघटनेस केली आहे.

ठाणे महापालिकेचे शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी इंडिपेंडेंट स्कूल संघटनेस या संदर्भात पत्र लिहिले आहे. त्यात, शिक्षण विभागाने अनधिकृत शाळा बाबतीत प्राधान्याने व सातत्याने केलेल्या कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे दिला आहे.

१. जनजागृती : अनधिकृत शाळांमध्ये पालकांनी त्यांच्या पाल्याचे प्रवेश घेऊ नये यासाठी व्यापक जनजागृतीकरिता अनधिकृत शाळांची यादी यापूर्वी दि.28/03/2023,दि.11/07/2024 व दि.20/07/2024 रोजी स्थानिक वृत्तपत्रामध्ये व संबंधित शाळांच्या दर्शनी बाजूला फ्लेक्सव्दारे प्रसिध्द करण्यात आले होते. तसेच पुनश्च दि. 28/01/2025 व दि.25/04/2025 रोजी स्थानिक वृत्तपत्रात सद्यस्थितीत असलेल्या 81 अनधिकृत शाळांची यादी प्रसिध्द केली आहे. तसेच सदर शाळांची यादी जाहिरात फलकाद्वारेही प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. प्रशासकीय कारवाई :- अनधिकृत शाळांना वेळोवेळी कारणे दाखवा नोटीसेस देण्यात आलेल्या आहेत. यानुसार व उपरोक्त कायदेशीर तरतुदीनुसार सदर अनाधिकृत शाळांना दंड आकारणी करण्यात आलेली आहे. दि. 03/01/2025 व दि.25/04/2025 रोजी मालमत्ता कर विभागास दंड वसूली करणेबाबत पत्र दिले आहे. सदर अनधिकृत शाळांना आकारलेल्या दंडाची वसूली मालमत्ता कराची थकबाकी वसूलीप्रमाणे मालमत्ता कर विभागामार्फत सुरू आहे. त्याचप्रमाणे पाणी पुरवठा विभागामार्फत सदर शाळांच्या अनधिकृत इमारतीचा पाणी पुरवठा बंद करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यानुसार 32 शाळांचा पाणी पुरवठा बंद केल्याचा अहवाल प्राप्त आहे. तसेच सदर अनधिकृत शाळांच्या इमारती अनधिकृत आहेत अगर कसे याबाबत तपासणी करुन अनधिकृत इमारतीवर नियमोचित कार्यवाही करणेबाबत अतिक्रमण विभागास दि.03/01/2025 व दि. 30/04/2025 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे व त्याचा पाठपुरावा सुरू आहे.

३. फौजदारी कारवाई :- अनधिकृत शाळांवरती शासन निर्देशानुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

४. मा. उच्च न्यायालय संदर्भ :- महाराष्ट्र इंग्लिश स्कूल संघटना (MESTA) व अन्य राजकीय पक्ष, संघटना अनधिकृत शाळा बंद करणेबाबत वारंवार पाठपुरावा करत असून MESTA संघटनानी मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.16432/2024 दाखल केलेली आहे. त्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने दि.30/01/2025 रोजी मा.उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष 2025-26 मध्ये सदर अनधिकृत शाळांमध्ये एकही विद्यार्थ्यांचा प्रवेश न करण्याबाबत पुनश्चः नोटीसेस बजावण्यात आल्या आहेत.

५. विद्यार्थ्यांचे समायोजन - ठाणे महानगरपालिका क्षेत्रात एकूण 81 अनधिकृत शाळा असून विद्यार्थी पटसंख्या 19,708 आहे. अनधिकृत शाळेतील विद्यार्थ्यांचे समायोजन अधिकृत शाळेत करण्यासाठी सर्व मान्यता प्राप्त शाळा व्यवस्थापनाची सहविचार सभा वेळोवेळी घेण्यात आल्या. सदर विद्यार्थ्यांचे समायोजनाबाबत या मान्यता प्राप्त शाळेंनी त्यांच्या शैक्षणिक शुल्कामध्ये सवलत देण्याचे मान्य केले आहे.

ठामपा शिवि जा.क्र.5403/25 दि. 17/03/2025 च्या पत्रान्वये अनाधिकृत शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांशी संपर्क करुन येत्या शैक्षणिक वर्षात त्यांच्या पाल्यांचा प्रवेश नजिकच्या मान्यता प्राप्त शाळेमध्ये करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. याकरीता 9 पथके गठित केली आहे. सदर पथकावर शाळांतील विद्यार्थ्यांचे समायोजनाची जबाबदारी देण्यात आली आहे. सदर विद्यार्थ्यांचे अन्यत्र मान्यता प्राप्त शाळांत समायोजन करणेबाबत सक्त निर्देश देण्यात आले आहे व याचा नियमित पाठपुरावाही सुरु आहे. तसेच 3 अनधिकृत शाळा कायमस्वरुपी बंद झालेल्या आहेत.

## भिवंडी शिवसेना तर्फे हिन्दी सक्ती विरोधात शासन अध्यादेश जाळून निदर्शने



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** राज्यात तिसरी भाषा म्हणून हिंदी ची सक्ती केली जात असून त्याविरोधात राज्यात जनक्षोभ उसळता आहे. या निर्णयास विरोध करण्यासाठी भिवंडीत शिवसेना ( ठाकरे ) पक्षाचे भिवंडी जिल्हाप्रमुख मनोज गगे यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौक याठिकाणी शासन अध्यादेशाच्या प्रतींची होळी करीत निदर्शने करीत शासना विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

आज दुपारी झालेल्या या आंदोलनात शहर प्रमुख प्रसाद पाटील,माजी शहरप्रमुख मोहन बल्लाळ,महिला संघटक वैशाली मेस्त्री, राजा पुण्यार्थी,युवासेनेचे पंकज घरत,नाना झळके,मनिष गिरी,नितेश दांडेकर यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. भिवंडी शहरातील अजय नगर येथील शिवसेना शाखा कार्यालयातून हातात निषेध फलक घेऊन मोठ्या संख्येने शिवसैनिक छत्रपती शिवाजी महाराज चौकात जमले होते तेथे अध्यादेशाच्या प्रतींची होळी करीत घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## ठाणे जिल्ह्यात विशेष आर्थिक साक्षरता मोहीम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाच्या निर्देशानुसार, ठाणे जिल्ह्यात 1 जुलै ते 30 सप्टेंबर 2025 या कालावधीत विशेष आर्थिक साक्षरता मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेचा उद्देश सामान्य नागरिकांमध्ये विशेषतः ग्रामीण भागातील, महिला, वृद्ध नागरिक, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक यांच्यात वित्तीय जागरूकता निर्माण करणे आहे. यामध्ये डिजिटल आर्थिक साक्षरता, जबाबदारीने कर्ज घेणे, फसवणूक टाळण्यासाठी



जागरूकता, तसेच प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधान मंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेंशन योजना या सामाजिक सुरक्षा योजनांची माहिती दिली जाणार आहे.

जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँका, खासगी बँका, डीसीसी बँक यांच्या ग्रामीण शाखा या मोहिमेत सक्रीय सहभाग घेतील. बँक शाखांमार्फत शिबिरे, गावोगावी जाऊन जनजागृती आणि प्रचार कार्यक्रम राबविले जातील. दुर्गम व दुर्लक्षित भागांपर्यंत वित्तीय सेवा पोहोचविण्यावर विशेष भर दिला जाईल.

सर्व नागरिक, स्वयं-सहायता समूह, ग्रामस्तरीय अधिकारी, पंचायत प्रतिनिधी व स्थानिक प्रसारमाध्यमांना आवाहन करण्यात येते की त्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा.

अधिक माहितीसाठी किंवा आपल्या परिसरातील कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नजीकच्या बँक शाखेशी किंवा ठाणे जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक कार्यालयाशी संपर्क साधावा. ही मोहीम मा. जिल्हाधिकारी ठाणे, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. ठाणे यांच्या मार्ग दर्शनाखाली राबविण्यात येणार आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४१११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024